खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### दै. पुढारी व मराठी विभाग आयोजित : वाचन प्रेरणा दिन

पुढारी

# सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी वाचनसंस्कृती हवी

## डॉ. संजय शिंदे यांचे प्रतिपादन; दै. 'पुढारी'च्या सहकार्याने 'वाचन प्रेरणा दिन'

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

समाजमाध्यमांच्या प्रभावामुळे वाचनसंस्कृती धोक्यात आली असून, सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी वाचनाचा वसा घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व दै. 'पुढारी' यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रमात 'वसा वाचनाचा' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे होते. या प्रसंगी पत्रकार कोंडीभाऊ पाचारणे, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. गणेश धुमाळ, संदीप थोरात, डॉ. प्रभाकर जगताप आदी उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे म्हणाले की, वाचनभान वाढविण्यासाठी वर्तमानपत्रांची भूमिका महत्त्वाची आहे. दै. 'पुढारी'च्या माध्यमातून वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्न केला जात असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक अवांतर वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. इतिहास व ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांचे 'डिजिटल ग्रंथालय' या विषयावर व्याख्यान झाले.

'वाचन प्रेरणा दिना'चे औचित्य साधून मराठी विभागाने अभिवाचन, काव्यवाचन, निबंध स्पर्धा, व्याख्यान, दिवाळी अंक भेट आदी उपक्रमांचे आयोजन केले. चाकण कला, वाणिज्य महाविद्यालयाचे डॉ. शिवाजी एंडाईत यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास व वाचनसंस्कृती' या विषयावर मार्गदर्शन केले. 'मला प्रभावित करून गेलेले पुस्तक' या विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक अपेक्षा कर्वे (माती, पंख आणि आकाश : ज्ञानेश्वर मुळे), द्वितीय क्रमांक ऋषिकेश काची (पाणी पाणी : लक्ष्मीकांत देशमुख), तृतीय क्रमांक स्नेहल देवदरे (श्यामची आई : साने गुरुजी) यांचा आला.

My Gramin Edition
Oct 18, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभागप्रमुख